Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

Vol.- 3 Issue - 4

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December
2016

Chief Editor –
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof. (Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with CamScanner

Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**Octomber-November-December-2017**

**Vol.-3, Issue-4**

**Chief Editor –**
**Prof. Dhanraj Dhangar**
**Asst. Prof.(Deptt. of Marathi)**
**M.G.V.'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.

**- कार्यकारी संपादक**

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 225/-

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

## INDEX


| No. | Title of the Paper / Name of the Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Ethanobotanical Studies on *Terminalia chebula* Retz. among the Indigenous people of Nizamabad and Kamareddy Districts, Telangana State. **Vijigiri Dinesh and Shivraj Kashinath Bembrekar** | 04 |
| 2 | Comparative Literature: Some Critical Observations **Dr. Leena Pandhare** | 08 |
| 3 | 'अंधेर नगरी' : प्रतीकात्मकता एवं युगबोध **डॉ. अमोल दंडवते** | 15 |
| 4 | रमणिका गुप्ता की पर्यावरण संविद्य कविता **सुश्री वंदना पाटील** | 19 |
| 5 | पर्यावरणीय समस्या आणि मनुष्य केंद्रवाद : ऐतिहासिक निरीक्षण **डॉ. संजय ह. पाटील** | 22 |
| 6 | मराठीचा उगमकाल, जनक भाषा आणि अभिजातता **डॉ. प्रमोद अंबेकर** | 37 |
| 7 | मराठी संत साहित्य **डॉ. रामदास रसाळ** | 43 |
| 8 | संत साहित्य आणि दलित साहित्य **डॉ. लक्ष्मिकांत येळवंडे** | 46 |
| 9 | बंजारा साहित्यातील स्त्री चित्रण **प्रा. व्ही. बी. राठोड** | 49 |
| 10 | भटक्या-विमुक्त जमातीच्या स्त्री-आत्मकथनांचा सामाजिक, भाषिक व सांस्कृतिक अभ्यास **डॉ. गोपाल ढोले** | 55 |
| 11 | मराठीतील पहिले प्रवासवर्णन : माझा प्रवास **डॉ. मीनाक्षी पाटील** | 58 |
| 12 | दलित पत्रकारितेचा प्रारंभ **डॉ. रामदास रसाळ** | 62 |
| 13 | मराठी ग्रामीण साहित्याचा मानदंड : डॉ. आनंद यादव **डॉ. अरुणा मोरे** | 66 |
| 14 | आत्मनिष्ठेच्या बळावर उभे राहिलेले आत्मचरित्र –'लांबा उगवे आगरी' **डॉ. भाऊसाहेब गमे** | 69 |
| 15 | जागतिकीकरण आणि सुनील अवचार यांची कविता **प्रा. सागर गवई** | 72 |
| 16 | तेलंगाणा राष्ट्र समिती **प्रा. माधव चोले** | 78 |
| 17 | भारतातील विरोधी पक्षाची भूमिका **प्रा. मनिष सोनवणे** | 84 |
| 18 | भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, शासनाचे प्रयत्न व उपाय योजना **डॉ. सुरेश बन्सपाल** | 88 |
| 19 | येवल्याची सांस्कृतिक- साहित्यिक परंपरा **डॉ. बी. व्ही. गमे** | 92 |
| 20 | तेदेपाची तेलंगाणा बाबत दुटप्पी भूमिका **प्रा. माधव चोले** | 96 |
| 21 | प्राण्यांविषयी पारंपरिक विचारसरणी : एक तात्त्विक विवेचन **डॉ. संजय ह. पाटील** | 101 |




Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Vol. 3, Issue-4
ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

# तेलंगणा राष्ट्र समिती

**प्रा. माधव चोले**
**(सहाय्यक प्राध्यापक) राज्यशास्त्र विभाग,**
**देगलूर महाविद्यालय, देगलूर**
**मो.नं.९९७०५६३३८५**
**Email** - cholemadhave@gmail.com

कल्वाकुंटा चंद्रशेखर राव हे मुळात काँग्रेसचे कार्यकर्ते होते. मात्र विधानसभेसाठी काँग्रेसकडून तिकिट न मिळल्याने त्यांनी तेलगु देशमध्ये प्रवेश केला. १९९५ मध्ये ते सिध्दपेट मतदार सघांतून ते विधानसभेवर निवडूण आले. तेलगु देशमची सत्ता असतांना ते मंत्री होते. (१९९७- १९९९) १९९९ च्या विधानसभा निवडणूकीत परत ते आमदार झाले. पण चंद्राबाबु नायडूंनी त्यांना मंत्रीपद न देता त्यांच्याच येलमा जातीतील नवे नेते विजय रामराव यांना संधी देण्यासाठी त्यांना मंत्रीमंडळातून वगळून विधानसभेत उपाध्यक्षपद दिले तिथेच त्यांची नाराजी दिसुन आली. [१] त्यांनी एप्रिल २००१ मध्ये तेलगु देशम पक्षाचा राजीनाम दिला व स्वतंत्र तेलंगणाची मागणी करित २००१ मध्ये 'तेलंगणा राष्ट्र समितीची' स्थापना केली.

**तेलंगणा राष्ट्र समिती :-**

TRS ने हैद्राबाद राजधानी असलेले तेंलंगणा राज्य निर्माण करण्याचा 'एक-कलमी' जाहिरनामा जाहिर केला.[२] १९९९ च्या निवडणूकीत भाजपा आणि देलगु देशम आघाडीला अभुतपूर्व यश मिळाल्याने भविष्य काळात तेलगु देशमला हटविण्यासाठी स्वतंत्र तेलंगणाचा मुद्दा घेवून तेलंगणातील काँग्रेस आमदारांनी' तेलंगणा काँग्रेस लेजिस्लेटर फोरमची' स्थापना केली 'तेलंगणा राष्ट्र समिती' (TRS) आणि तेलंगणा काँग्रेस लिजिस्लेटर फोरम (TKLM) यांनी तेलंगणाच्या मुद्दयावर २००१ मध्ये पंचायत निवडणूका लढवल्या निझामाबाद आणि करिमनगर जिल्ह्यात टि.आर.एस ने तेलगु देशमवर मात केली तर मेदक व वरंगल येथील जिल्हा परिषदांमध्ये लक्षणीय यश मिळविले तेलंगणा विभागात बहुतांशी ठिकाणी हा पक्ष त्रिशंकु अवस्थेत होता. मात्र मागास असलेल्या अदिलाबाद आणि महेबूबनगर जिल्ह्यात हा पक्ष फारसा प्रभाव पाडू शकला नाही.[३]

**२००४ च्या लोकसभा आणि राज्यविधानसभा निवडणूका :-**

१९९९ च्या निवडणूकीत काँग्रेसचा केंद्रात आणि राज्यविधानसभेत पराभव झालेला होता. या पार्श्वभुमीवर काँग्रेसने २००४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत TRS ला पृथक तेलंगणा राज्य स्थापन करण्याचे वचन दिले. त्यासाठी दुसरा राज्य पुनर्रचना आयोग (Second SRC) स्थापना करण्याचे आश्वासन देवून TRS सोबत युती केली होती.[४] या निवडणूकीत TRS ला लोकसभेत पाच जागा मतांची टक्केवारी (६.८ टक्के) होती. तर विधानसभेत २६ जागा आणि मताची टक्केवारी (६.७) टक्के होती. काँग्रेस राज्यात सत्तेवर आली तसेच 'केंद्रात संयुक्त सरकार' (युपीए) स्थापन झाले. रावला केंद्रात मंत्रीपद मिळाले राव केंद्राच्या संयुक्त सरकारामध्ये सहभागी झाले. राव संयुक्त सरकारच्या 'सामान्य किमान कार्यक्रम' (Common minimum Programme) या मध्ये 'पृथक तेलंगणाचा मुद्दा' समाविष्ट करण्यात यशस्वी झाले. [५] पण आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री डॉ.राजशेखर रेड्डी यांचे राज्यातील काँग्रेस वरचे वर्चस्व वाढले त्यांनी काँग्रेसला बळकटी दिली. त्यांनी स्वतंत्र तेलंगणाला विरोध दर्शविला त्यामुळे काँग्रेसने KCR ला स्वतंत्र तेलंगणासाठी 'दुसरा राज्यपुनर्रचना आयोग' स्थापन करण्याचे दिलेले आश्वासन फोल ठरले.



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

त्यामुळे चंद्रशेखर राव यांनी मंत्री पदाचा राजीनामा देत सप्टेंबर २००६ मध्ये काँग्रेस नेतृत्व प्रणीत संयुक्त सरकारचा पाठिंबा काढून घेतला [६] पक्षातील १२ आमदारांनी पक्षाविरुध्द बंड पुकारले त्यांनी काँग्रेसला पाठिंबा दिला.

**२००९ च्या निवडणूका :- (TRS)**

२००९ च्या विधानसभा आणि लोकसभेच्या सार्वजनिक निवडणूकीच्या वेळी काँग्रेस सकट सर्वच पक्षांनी वेगळ्या तेलंगणा निर्मितीला पांठिंबा दिला. रावने २००४ च्या निवडणूकीत काँग्रेस सोबत स्वतंत्र तेलंगणाच्या मुद्दयावर युती केली होती पण न पाळल्याने ते बाहेर पडले होते. या निवडणूकीत चंद्रशेखर राव यांनी चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगु देशमशी युती केली. नायडु यांनी तेलंगणास असणारा विरोध सोडून दिला आणि स्वतंत्र तेलंगणा राज्यास पार्ठींबा दिला. चिरंजीवीच्या प्रजाराज्य पक्षाने ही स्वतंत्र तेलंगणास पाठिंबा दिला. मात्र डॉ.राजशेखर रेड्डी यांचा विरोध होता. या निवडणूकीत काँग्रेसला बहुमत मिळून केंद्रात आणि राज्यात काँग्रेसची सत्ता आली. या निवडणूकीत 'तेलंगणा राष्ट्र समितीला' लोकसभेत फक्त २ जागा मिळाल्या तर विधानसभेत ४५ जागा लढवल्या १० जागा जिंकल्या मतदानांची टक्केवारी (४.० टक्के ) होती. अर्थात राव व नायडु यांच्या आघाडीचा तेलंगणा भागात मोठा पराभव झाला. डॉ.राजशेखर रेड्डी आंध्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या विरोधामुळे रावला स्वतंत्र तेलंगणाची चळवळ सुरु करता आली नाही.[७] या काळात कांही प्रसारमाध्यमांनी तेलंगणाची भावना क्षीण झाल्याचे विश्लेषण केले.

**रावचे अमरण उपोषण आणि स्वतंत्र तेलंगणाची घोषणा :-**

ऑगस्ट २००९ मध्ये डॉ.राजशेखर रेड्डी याचे हेलिकॅप्टर अपघातात निधन झाले. निधनानंतर चंद्रशेखर राव यांनी पुन्हा समर्थकांची जमवा-जमव करुन आंदोलन सुरु केले. त्याचे पुत्र रामाराव यांनी उस्मानिया विद्यापीठ, काकतीय विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने रस्त्यावर येवून पुन्हा स्वतंत्र तेलंगणाची चळवळ सुरु केली. डॉ.रेड्डीच्या निधनानंतर काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा पेचप्रसंग उभा राहिला व तसेच राज्यात काँग्रेस पार्टीसाठी राजकिय पोकळी निर्माण झाली.[८] याच कालखंडात टि.आर.एस. चे अध्यक्ष के.सी.आर यांनी पृथक तेलंगणासाठी खेळपट्टी वाढवली २९ नोव्हेंबर २००९ रोजी के.चंद्रशेखर राव (KCR) यांनी काँग्रेसने संसदेत पृथक तेलंगणा विधेयक सादर करावे यासाठी अमरण उपोषण सुरु केले त्यांना आंध्रप्रदेश सराकरने अटक केली.[९] सामान्य संपाने ६ व ७ डिसेंबर २००९ रोजी तेलंगणा बंद केला. या बंदमध्ये विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, अशा अनेक संघटना सामील झाल्या होत्या.

राज्य सरकारने ७ डिसेंबर २००९ रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावून घेतले व KCR चे उपोषण कसे हाताळायचे यावर चर्चा केली. प्रमुंख विरोधी पक्षांनी स्वतंत्र तेलंगणाला आपला पाठिंबा भक्कम केला [१०] विद्यार्थी संघटनांनी राज्यविधान सभेवर १० डिसेंबर रोजी प्रचंड सभेचे आयोजन केले. सरकारने या सभेस परवानगी मिळणार नाही. असे कडकपणे सुचित केले. आणि तेलंगणाभर आपले पोलीस दल तैनात केले होते. ११ दिवसांच्या उपोषणानंतर रावची तब्येत खालावली होती. त्याचा ही दबाव होता तरीपण स्वतंत्र तेलंगणाला प्रजाराज्यम, तेलगु देशम, काँग्रेस व भाजपाचा पांठिबा असल्यामुळे विरोध होणार नाही हे गृहीत धरण [११] ९ डिसेंबर २००९ रोजी केंद्रीय गृहमंत्री पी.चिंदबरम यांनी सांगितले की, आंध्रा राज्याच्या विधान सभेमध्ये प्रलबित असलेले तेलंगणा निर्मितीचे विधेयक भारत सरकार 'तेलंगणा निर्मितीची प्रक्रिया' सुरु करेल. तेंव्हा KCR यांनी रुग्णालयातील खाटेवरुनच हा तेलंगणातील लोकांचा खरा विजय आहे. (True Victory of the People of Telangana) असे म्हणून त्यांचे ११ दिवसांचे उपोषण सोडले. [१२]

**काँग्रेसचे घुमजाव आणि टि.आर.एस चे आंदोलन :-**

तेलंगणा समर्थकांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचे महोत्सव साजरे केले तर त्याचवेळी कोस्टल आंध्रा आणि रायलसिमा प्रदेशातील विद्यार्थी, कामगार, वकिल आणि इतर संघटनांनी 'सामाऐक्य आंध्रा' चळवळ सुरु करुन 'एकसंघ आंध्रा' ठेवण्याची मागणी केली. [१३] अर्थात तेलंगणा विरुध्द आंध्रा नव्या वादाला सुरुवात झाली यातुन



Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
Oct-Nov-Dec 2017

राजकिय पक्षांचा विचार न करता तेलंगणा समर्थक आमदार, खासदार व अखंड आंध्रा समर्थक आमदार, खासदार अशी विभागणी झाली २९४ सभासद असणाऱ्या विधानसभेच्या ९२ आमदारांनी राजीनामे दिले. सीमांध्रा प्रदेशातील लोकांचा विरोध पाहून २३ डिसेंबर २००९ रोजी राज्यातील सर्व पक्षांचे व गटांचे तेलंगणा निर्मितीस जोपर्यंत एकमत होणार नाही तोपर्यंत सरकार कोणतीही कार्यवाही करणार नाही. राज्याच्या विभागणीस (Bifurcating) विलंब या विरुध्द, सभा, उपोषण संप आणि आत्महत्या या तेलंगणामध्ये चालुच होत्या, केंद्रासरकारने आपली भुमिका व बदलाचे वेळापत्रक जाहिर करावे म्हणून सर्वपक्षीय कृती समिती (Joint Action committee -JAC) ने साखळी उपोषण (Relay hunger strike) सुरु केले आणि २८ जानेवारी २०१० रोजी सर्वच आमदारांनी राजीनामे दिले. [१४] तेंव्हा ३ फेब्रुवारी २०१० रोजी तेलंगणा राज्याच्या मुद्दयाची पाहाणी करण्यासाठी पाच सदस्यीय श्रीकृष्ण समिती जाहिर करण्यात आली.

**श्रीकृष्ण समितीचा अहवाल :- (३० डिसेंबर २०१०)**

श्रीकृष्ण समिती अहवाल सादर करण्या अगोदर म्हणजे १६ डिसेंबर २०१० रोजी TRS ने वरंगल मध्ये एक सार्वजनिक सभा बोलविली होती.तेथे जवळपास १.२ ते १.५ मिलियन लोकांनी सभेला गर्दी केलेली होती. [१५] TRS अध्यक्ष के.सी.आर यांनी पंतप्रधान मनमोहनसिंगकडे निवेदन दिले की, तेलंगणातील लोक आपली सहनशीलता/धीर हरवून जात आहेत. यांची नोंद घ्यावी त्यांनी मागणी केली की संसदेच्या आगामी अधिवेशनात तेलंगणा विधेयक सादर करावे,[१६] के.सी.आर सोनिया गांधींना म्हणाले होते. त्यांनी तेलंगणा निर्मिती केल्यास आमचा पक्ष काँग्रेसमध्ये विलिन होईल.

एका सर्वपक्षीय बैठकीत ६ जानेवारी २०११ रोजी गृहमंत्रालयाने दोन खंडामध्ये श्रीकृष्ण समिती अहवालाचे ५०५ पृष्ठ सार्वजनिक केले या अहवालावर के.सी.आर ने पृथक तेलंगणा निर्मितीचा सर्वोत्तम उपाय आहे व राजधानी हैद्राबाद असावी असे म्हणाले त्यांनी अखंड आंध्रा ठेवण्याचा विरोध केला. [१७]

**असहकार चळवळ आणि मिलियन मार्च :- (२०११)**

१७ फेब्रुवारी २०११ रोजी १६ दिवसापर्यंत सुरु केलेल्या असहकार चळवळीत तेलंगणा राष्ट्र समितीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता. या अहसहकार चळवळीत ३ लाख लोकांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे सरकारचे प्रतिदिवस ८ बिलियन (शंभर कोटी) चे नुकसान झाले.[१८] त्याचप्रमाणे सप्टेंबर मधील तशाच संपाने २५ दिवसात १४००० कोटी रुपयाचे नुकसान झाले.

१० मार्च २०११ रोजी तेलंगणा कृती समिती ने (TJAC) ने (Million March) मीलियन मार्च चे हैद्राबाद मध्ये आयोजन केले. या मिलियन मार्चमध्ये तेलंगणा राष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

नोंव्हेबर २०११ मध्ये तेलंगणा राष्ट्र समिती विद्यार्थी विभागाचे (TRSV) राज्य अध्यक्ष बाळकी सुमन यांना हैद्राबाद पोलीसांनी अटक केली मिलियन मार्च वेळी टॅकबँड येथे पोलीसावर हल्ला करुन पोलीसांच्या व प्रसार माध्यमांच्या गाड्या वाहनांचे नुकसान केले म्हणूव त्यांच्यावर खटला भरला [१९] ४ ते ५ जुलै २०११ रोजी स्वतंत्र तेलंगणा निर्मितीला उशीर होत आहे. म्हणून तेलंगणातील सर्वपक्षीय खासदार आमदारांनी राजीनामे दिले त्यात तेलंगणा राष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी ही राजीनामे दिले होते.[२०]

**घटनाक्रम, पोटनिवडणूका आणि टी.आर.एस च्या शक्तीत वाढ :-**

१२ सप्टेंबर २०११ रोजी टि.आर.एस.ने करिमनगर येथे सार्वजनिक सभा भरविली त्यात दहालाख लोकांपेक्षा जास्त लोकांनी भाग घेतला. तेलंगणा संयुक्त कृती समिती (TJAC) BJP आणि न्यु डेमोक्रॅटिक पार्टिच्या नेत्यांनी भाग घेतला होता.



Scanned with CamScanner

२ ऑक्टोंबर २०११ रोजी संयुक्त कृती समितीचे नेते, कर्मचारी संघटनाचे नेते आणि KCR सहित TRS चे नेते पंतप्रधानांना भेटले आणि संपामुळे तेलंगणातील परिस्थिती कशी झाली याचे स्पष्टीकरण दिले व त्यासाठी पंतप्रधानांनी स्वतंत्र तेलंगणा करावे असे सांगीतले. [२१]

२९ ऑक्टोंबर २०११ रोजी तेलंगणातील तीन काँग्रेस आमदारांनी आपल्या पदांचे राजीनामे देवून काँग्रेस नेतृत्वाने पृथक तेलंगणा निर्मितीस उशीर करत असल्याने टि.आर.एस मध्ये सामील होवून आंदोलनात सहभागी झाले.[२२] १८ मार्च २०१२ रोजी तेलंगणातील ६ विधानसभा जागांसाठी पोटनिवडणूक झाली टि.आर.एस ने या निवडणूकीत ५ जागापैकी ४ जागा जिंकल्या त्या जागा १५,० २४ ते ४४, ४६५ एवढ्या मताधिक्याने जिंकल्या ४ पैकी २ जागा टि.आर.एस.ने (कामारेड्डी आणि आदिलाबाद) जिंकल्या टि.आर.एस. उमेदवारांनी २००९ च्या विधानसभा निवडणूकीच्या तुलनेत कमी मते मिळविली तेंव्हा ते TDP चे उमेदवार होते. TRS आणि TDP यांची युती होती. १२ जुन २०१२ रोजी १८ विधानसभा व एक संसद सदस्यासाठी पोट निवडणूक झाली. या निवडणूकीत TRS उमेदवारांनी YSRCP उमेदवार कोंडा सुरेखा यांच्याशी मॅनेज करुन १५६२ एवढ्या बेताच्याच बहुमताने परकल (Parkal) ची जागा जिकंली [२३, २४] १४ ऑगस्ट २०१२ रोजी :- KCR यांनी राज्य जाहिर करण्याची केंद्राला दोन आठवड्याची मुदत दिली. केंद्र सरकारने जर असे केले नाही तर आंदोलनाचें दुसरे चक्र सुरु करण्याचे वचन दिले. नंतर त्यांनी असे समजल्याचे जाहिर केले की, ईद नंतर सकारात्मक घोषणा करण्यात येईल [२५] KCR दुसऱ्या एका मुलाखतीत म्हणाले की, सोनिया गांधी तेलंगणाच्या बाबतीत नेहमीच सकारात्मक राहत आलेल्या आहेत. कांही आठवड्यात किंवा एवढ्यांत त्या चर्चा करण्यासाठी माझ्या पक्षाला चर्चा करण्यासाठी बोलवतील.[२६]

६ सप्टेंबर २०१२ रोजी KCR दिल्लीला गेलें आणि जाहिर केले की, हा प्रश्न सप्टेंबर अखेर पर्यंत सोडविण्यात येईल. दिल्लीत २३ दिवस थांबल्यानंतर के.सी.आर. काँग्रेस नेतृत्वासोबत शेवटी बोलणी होणार असल्याची आशा करत हैद्राबादला परत आले. त्यांनी प्रत्येक नेत्यासोबत केलेली चर्चा फळाला आल्याचा दावा केला.[२७]

RESEARCH JOURNEY

२८ डिसेंबर २०१२ रोजी भारताचे गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी तेलंगणा मुद्दयावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले. ८ राजकिय पक्ष ज्यांना राज्यविधान सभेत महत्वाचे स्थान आहे. समितीचे KCR होते सुशीलकुमार म्हणाले ही, या मुद्दयावरल अंतिम बैठक असेल शासन ३० दिवसात निष्कर्षापर्यंत येईल.

११ मे २०१३ रोजी वरिष्ठ नेते आणि पॉलीट ब्युरो सदस्य कडीयाम श्रीहारी (Kadiyam Shrihari) यांनी TDP वर नाराज होऊन कारण TDP चा तेलंगणा निर्मितीचा संदिग्ध विचार होता. त्यांनी TDP चा प्रतिनिधी म्हणून डिसेंबर २०१२ च्या सर्वपक्षीय बैठकीला दिली येथे उपस्थित होते. चार दिवसानंतर ते TRS मध्ये सामील झाले.[२८]

२ जून २०१३ रोजी काँग्रेसचे दोन खासदार जी वेवेकानंद आणि मंदा जगन्नाथ आणि एक माजी काँग्रेस राज्यप्रमुख के.केशवा राव यांनी तेलंगणा निर्मितीस विलंब होत असल्याने औपचारिकपणे TRS मध्ये सामील झाले. [२९]

**चलो असेंब्ली :- (१४ जून २०१३) -**

१४ जुन २०१३ रोजी तेलंगणाच्या निर्मितीच्या मागणीसाठी हैद्राबाद येथे राज्यविधान सभेला घेराव / घालण्यासाठी बोलविले. त्यास सरकारने परवानगी नाकारली. चलो असेंब्लीच्या आंदोलनात TRS कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. याचे आयोजन TJAC ने केलेली होते. [३०]

जून २०१३ च्या माध्यमामध्ये उल्लेख (IBN लोकमत) राज्यसरकारांसाठी सामान्य लोकांचा राज्यांतर्गत सर्वे करण्यात आला. त्यात काँग्रेस पक्ष विधानसभा आमदारांच्या २९४ जागापैकी ३५-४० जागा जिंकेल राज्यातील तेलंगणा



Scanned with CamScanner

भागात TRS पक्ष आघाडीवर राहील व YSRCP ही सीमा-आंध्रात पुढे राहील असा लोकमतांचा कल दिसला. ह्या पाहणीचा तेलंगणा राज्याची निर्मिती करण्याच्या जवळ पोहचण्यास मदत झाली. [३१]

काँग्रेस कृती समितीने ३० जुलै २०१३ रोजी आंध्राचे विभाजन करुन तेलंगणा राज्य निर्माण करण्याचा प्रस्ताव पारित केला. हैद्राबाद ही १० वर्षासाठी संयुक्त राजधानी असेल. १० वर्षानंतर आंध्रासाठी नवीन राजधानी निर्माण केली जाईल.[३२] तेलंगणा घोषणेनंतर के.सी.आर ने प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली ते म्हणाले 'जो पर्यंत संसदेत स्वतंत्र राज्याचे विधेयक पारित होत नाही तो पर्यंत लक्ष दयावयाला पाहिजे' आम्ही काँग्रेसच्या निर्णयाचे स्वागत करतो. अर्थात तेलंगणात सर्वत्र दिवाळी साजरी करण्यात आली. के.सी.आर. च्या मते १० वर्षे हैद्राबाद संयुक्त राजधानी असण्याला आमचा विरोध नाही. दोन्ही राज्यांचा कारभार हैद्राबादमधून व्हावा पण हैद्राबाद हि तेलंगणातील कायम राजधानी असावी कारण ती तेलंणाच्या भुप्रदेशात आहे. [३३] तेलंगणा घोषणे नंतर अखंड आंध्रासाठी आंदोलन झाले.

३ ऑक्टोंबर २०१३ रोजी केंद्रीय मंत्रीमंडळाने स्वतंत्र तेलंगणा राज्याला हिरवा कंदील दिला. त्यासाठी १० सदस्यीय मंत्रीमगटाची स्थापना करण्यात आली. मंत्रीमंडळाच्या संमतीनंतर सीमांध्रात अखंड आंध्रासाठी आंदोलन व्यापक झाले ७२ तासांच्या कडकडीत बंद करण्यात आला. त्यात शासकिय, गैरशासकिय सर्वच संघटनांनी भाग घेतला[३४] हैद्राबाद येथे जगनमोहन रेड्डीने, तर दिल्ली येथे आंध्राभवनामध्ये चंद्राबाबू नायडूंनी 'अखंड आंध्रा' ठेवावे यासाठी अमरण उपोषण सुरु केले. विजयनगर मध्ये संचारबंदी लागु करण्यात आली तर वीज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे सीमांध्रा अंधारात बुडाला त्याचा परिणाम अत्यावश्यक सुविधेवर झालेला होता. ११/१२ ऑक्टोंबर २०१३ रोजी फायलीन चक्रीवादळ सीमांध्रात आल्याने आंदोलन शमले.[३५]

**संदर्भ सूची :**


१. माधव चोले, २०११ डिसेंबर, शोंध प्रबंधाचा संक्षिप्त (पी.एच.डी.) अहवाल, पृष्ठ १२. per Online edition Published from Adhra Pradesh, India.''
२. ''Amin jafri, Syed (२००१-०५-१७). Massive rally demands Telangana state''.rediff.com. http://ia.regiff.com.
३. के.सी.सुरी अनुवाद, मनोहर सोनवणे, जाने -मार्च २००४,लोकनुरंजनवादाकडून व्यवहारवादाकडे आंध्र प्रदेश १९८३ ते २००३ , समाज प्रबोधन पत्रिका पृष्ठ २८
४. ''Controversy over SRCblows over''. Andhra Pradesh (The Hindu). २००४-०३-०५ http://www.hindu.com/२००४/०३/
५. ''Common Mininum Programme of the congress led United Progressive Alliance''. Indian National Congress. May २००४. Archived from the orgiginal ०७, २००७-१२-१२. http://web.archive.org./web/२००७१२१२०८४८४६८.
६. ''TRS withdraws support to UPA govt''. rediff.com.२००६-०९-२३. http://ia.rediff.com/news/२००६/sep/२३trs१.him. २००८-०२-१६.
७. अशोक चौसाळकर , फेब्रुवारी २०१०, तेलंगणाचा तिढा, प्रबोधन प्रकाशन ज्योती, कोल्हापूर पृष्ठ ३२.
८. ''Why it is Telangana that holds the Key?'', The Hindu (India). ७ April २००९.
९. Government forcibly administers saline to end KCR's fast.
१०. Colleges in Telangana closed for १५ days.
११. Oppn oarties ask AP Govt to move resolution on Telangana.

१२. ''Centre agrees to from Telangana state''. Business Standeard १० December २००९. http://www.business-standard.com/india/news/centre-agrees-to-form-telangna-state/३७९१४२/१० December २००९.
१३. ''MIM, TDP members demand resolution in assembly on Srikrishana commitee report-Times of India'' Articles. Teimesfindia.indiatimes.com.१२ March २०११.
१४. Stick to Jan २८ deadline to quit: Telangana JAC tells legislators.
१५. ''Indin''.Lcweb२.loc.gov.http://lcweb२.loc.gov/cgibin/query/r?frd/cstdy:@field.(DOCID+in ००७५). २०१०-०९-१४.
१६. ''Amin jafri, Syed (२००१-०५-१७). Massive rally demands Telangana state''.rediff.com.http://ia.regiff.com.
१७. Separtate Telangana State only solution: KCR
१८. Telangana fury is costing AP ८०० cr a day.
१९. ''SRC submits report''.The Hindu (Channai India) १ October २००५.
२०. Crisis looms as ८१ Telangana MLAs, some MPs submit resignations.
२१. "People power driving Talangana agitation Road more at: http//in diatoday intoday.in/story/ people power-fuels-agitation-for-telangana/१५३११३०.htmi".India Today.
२२. "Railway station turns battleground". India Express १७ October २०११.
२३. Telanganna fury sings Congress in Andhra
२४. In Andhara Pradesh by-poolls, pro-Telangana TRS scores big| NDTV. com.
२५. ''Separate T-state not possibel: Asad''.Articles. timesofindia.indiatime.com. २०१२.०९.१४.
२६. Decide in १४ days: KCR to Center- The New Indian Express.
२७. Got postive signals from UPA for Telangana state but readying contingency strategy: KC Rao, TRS-Economic Times.
२८. ''Hyderabad simmers as Congress puts off Telangana Call''. Times of India. ३१ January२०१३
२९. ''२ MPs, Keshava Rao join Telangana Rashtra Samithi''. Wednesday, June ५,२०१३/०४:४०AM IST.Business Standard.
३०. ''Chalo assembly: Govt, Telanagana Political JAC set for a joust''. Artcles. timesofindia. indiatimes.com.२०१३-०६-१३.
३१. ''Congress Telangana options: Pack up, patch up or break up''. The New Indian Express. २०१३-०७-३१
३२. Got postive signals from UPA for Telangana state but readying contingency strategy:KC Rao, TRS-Economic Times.
३३. ''Telangana: TRS wants more talks with Congress''.Ibnlive.in.com.२०१२-१०-०४.
३४. महारष्ट्र टाईम्स, ४ ऑक्टोंबर २०१३, पृष्ठ १
३५. पी.टी.आय.हैद्राबाद /, नवी दिल्ली लोकसत्ता , १२ ऑक्टोंबर २०१३, पृष्ठ ९



Scanned with CamScanner